MHRG190008652023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक १३९/२०२० मधील निशाणी क्र.३४ वरील आदेश</u>** ::

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी त्यांचेविरुध्द झालेला 'अबेटमेंटचा' झालेला आदेश रद्द होऊन मिळणेबाबत विनंती केली आहे.

०२. अर्ज व अर्जदाराने दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व सामनेवाला यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. अर्जदारचे कथन की, मुळ अर्जदार यांचे अचानक निधन झाल्यामुळे त्यांचे कायदेशीर वारसांना शॉक बसल्यामुळे मुळ अर्जदार मयत झाल्याची माहिती वकीलांना मुदतीत दिलेली नसल्यामुळे सदरचा रेफरन्स अर्ज अबेट झालेला आहे. मुळ अर्जदार यांचा मुलगा दिलीप वामन सुतार हा देखील मुळ अर्जदार मयत होण्यापुर्वीच मयत झालेला आहे. सबब, अबेटमेंटचा आदेश रद्द करुन मिळण्याची विनंती केली आहे.

०४. सामनेवाला क्र.१ व २ यांनी अर्जदारच्या प्रस्तुत अर्जास हरकत नोंदवुन अर्ज मोघम स्वरुपाचा दाखल केलेला असुन विलंबाची कारणे सविस्तर नमुद केलेली नाहीत. अर्जातील कथने खोटी असल्याने अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

०५. अर्ज, अर्जाला दिलेले म्हणणे व परस्पर विरोधी युक्तीवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची

मागणी केली आहे. अर्जदार क्र.१ मयत झाल्यानंतर त्यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक होते परंतु दरम्यानचे काळात अबेटमेंटचा आदेश पारीत करण्यात आला. प्रस्तावित अर्जदार यांनी दिलेली कारणे संयुक्तीक दिसून येतात. अर्जाचे स्वरुप पाहता अर्जदार यांचे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास सामनेवाला यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जातील दिलेले कारण संयुक्तीक असुन अर्ज मंजुर होणेस पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

**:: <u>आदेश</u> ::**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

३. अर्जदार यांनी विहित मुदतीत अर्जदार यांचे वारस अभिलेखावर सादर करावेत.

JADHAV HEMLATA RAVINDRA
Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.01.22 14:51:20 +0530

महाड
दिनांक २२.०१.२०२६

(**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड